दावा दुरुस्ती नंतर वादीने अतिरिक्त पुरावा दिलेला असून त्यावरती

**प्रतिवादी तर्फे उलटतपास – श्री. आर. आर. चव्हाण वकील.**

**५.** गट क्र. ४६ हा माझ्या व प्रतिवादीच्या पुर्वहक्कदारांच्या वेगवेगळा वहिवाटीत असून त्याबाबतचा माझ्याकडे कागदोपत्री पुरावा नाही. मी गट क्र.४६ चे फिल्ड पाडुन घेतलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी गट क्र.४६ च्या मोजणीवेळी सर्व हद्दीच्या खुणा दाखवल्या होत्या. मी मोजणीवेळी हजर होतो. मला मोजणीच्या वेळी गट क्र.४६ च्या आजूबाजूंच्या गटांच्या हद्दी निश्चीत केल्याची माहिती नाही.

**६.** हे म्हणणे खरे नाही की, मी माझ्या शपथपत्रात प्रतिवादीने ४४.७५ चौ. मी. अतिक्रमण केल्याचे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी सांगत असल्याप्रमाणे प्रतिवादीने माझ्या मिळकतीत कोणतेही अतिक्रमण केलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी व मोजणीदार पठाण याने संगनमत करुन खोटा मोजणी नकाशा तयार केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी प्रतिवादीने अतिक्रमण केल्याचे खोटे सांगून आज खोटी साक्ष देत आहे.

**उलट तपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्वीकृती,**

Digitally signed by RAVI PANDURANG THORE

(आर. पी. थोरे)

दिनांक – २१.०७.२०२५. दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, आजरा.